# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०९ एप्रिल, २०१५ / चैत्र १९, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वित्त आणि नियोजन, वने मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री** | |
| **(३)** | **जलसंपदा मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

### हिंगोली जिल्हयातील अंगणवाडयामध्ये जंतनाशक गोळया खाल्ल्यामुळे एका मुलीचा मृत्यू झाल्याबाबत

**(१) * १५६४० श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील अंगणवाडयामध्ये जंतनाशक गोळया खाल्ल्यामुळे अनेक लहान मुलांना उलटया, मळमळ इत्यादी त्रास झाल्याने त्यामध्ये एका मुलीचा मृत्यू माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व संबंधित दोषींवर काय कार्यवाही करण्यात आली ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

सिध्देश्वर अंगणवाडी क्र.१ (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील अंगणवाडी केंद्रातील बालिकेचा जंतनाशक गोळी तोंडावाटे घेत असतांना श्वसन नलीकेमध्ये अडकल्यामुळे मृत्यू झाला आहे.

(२) व (३), मौ.सिध्देश्वर (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील प्रकरणी तालुका आरोग्य अधिकारी / बाल विकास प्रकल्प अधिकारी, ता.औंढा ना. यांनी सखोल चौकशी केलेली आहे. तालुका आरोग्य अधिकारी/ बाल विकास प्रकल्प अधिकारी, ता.औंढा ना.यांचा अहवाल व जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.हिंगोली यांचे अभिप्रायानुसार अंगणवाडी क्र.१ मधील अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांना मानधनी सेवेतून कमी करण्यात आले असून आशा स्वयंसेविका यांचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत तालुका आरोग्य अधिकारी, औंढा ना. यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

**धारणी, मेळघाट येथील मंजूर ४२ विहिरी ठेकेदारांच्या गैरव्यवहारामुळे अर्धवट राहिल्याबाबत**

**(२) * १५७४५ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी, मेळघाट येथील मंजूर ४२ विहिरीच्या निधीत ठेकेदारांनी केलेल्या गैरव्यवहारामुळे व काम अर्धवट केल्याने विहिरी तशाच पडलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय सहाय्यता प्रकल्पातंर्गत या ४२ विहिरी मंजूर करुन अमरावतीच्या २ ठेकेदारांना बांधकाम करण्यास नियुक्त केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बांधकामामध्ये १ कोटी २६ लाख रुपयांचा निधीचा दुरुपयोग झाला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, ठेकेदारांना अर्धी रक्कम देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासन याबाबत कोणती कार्यवाही करीत आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही, विशेष केंद्रीय सहाय्य या योजनेअंतर्गत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी यांच्या कार्यक्षेत्रात एकूण ५९ विहीरी बांधण्यास मंजूरी देण्यात आली असून यापैकी ३९ विहीरींचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच १६ विहीरींचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत ४ विहीरींचे काम काही तांत्रिक अडचणीमुळे सुरु झालेले नाही.

(२) विहीरींच्या बांधकामाकरिता विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार अमरावती जिल्हयातील दोन स्वयंसेवी संस्थांना नियुक्त करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही, योजना अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सुचनानुसार अंमलबजावणी यंत्रणे सोबत करार केल्यानंतर विहिरींचे बांधकामासाठी मंजूर असलेल्या रक्कमेपैकी ४०% रक्कम विहिरीची खोदाई करण्यासाठी आगावू अदा करण्याबाबतची तरतूद असल्याने संबंधित स्वयंसेवी संस्थांना ४०% रक्कम अदा करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चिंचोडी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामातील गैरव्यवहार**

**(३) * ५६५१ श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोडी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामांची रक्कम काही जणांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामाला मंजूरी मिळाली होती मात्र हे काम जेसीबी मशीनच्या सहाय्याने पूर्ण करून मजुरांच्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात आली त्यामुळे काम न करता मजुरी खात्यावर आली कशी याची चौकशी करण्याची मागणी जिल्हाधिका-यांकडे करण्यात आली आहे हे पाहता शासन त्वरित आवश्यक ती कोणती कारवाई करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
सदर कामावर एकूण ७९ मजुरांनी काम केले असून, या सर्व मजुरांच्या खात्यावर दि. ०३/०९/२०१४ व दि. ०८/०९/२०१४ रोजी मजूरीची रक्कम वर्ग करण्यात आली आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने या कामाची चौकशी विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कळमनुरी यांचेमार्फत करण्यात आली असून, चौकशी

अहवालानुसार सदर काम यंत्रा मार्फत न करता मजूरांमार्फत करण्यात आले आहे. तथापि या कामाची फेरचौकशी करण्यासाठी उप अभियंता (बांधकाम) व शाखा अभियंता, उप विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली या तांत्रिक अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर फेरचौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी आढळून आल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर नियमानुसार उचित कारवाई करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुत्रा किंवा वन्यप्राणी चावल्यास रुग्णांना आवश्यक असणा-या अॅन्टी रेबीज सिरम (एआरएस) लसीचा आरोग्य यंत्रणेकडे तुटवडा निर्माण झाल्याबाबत**

**(४) * ५४८४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिसाळलेला कुत्रा किंवा वन्यप्राणी चावल्यास रुग्णांवर उपचार करणारी अॅन्टी रेबीज सिरम (एआरएस) या लसीचा राज्यातील आरोग्य यंत्रणेकडे तुटवडा निर्माण झालेला असून विदर्भात ही लस शासकीय रुग्णालयासह खाजगी औषधी दुकांनामध्येही उपलब्ध नसून आता ही लस बंद होणार असल्याची माहिती दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केलेली आहे वा करणार आहे,
(३) असल्यास, अॅन्टी रेबीज सिरम (एआरएस) ही लस शासकीय रुग्णालयात उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारित असलेल्या रुग्णालयांमध्ये एआरएस (अॅन्टी रेबीज सिरम) या औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्ह्यातील धामणगांव रेल्वे येथील निम्नवर्धा प्रकल्पातील पाणी बिलदोरी नदीपात्रात आल्याने कौडण्यपूर ते अंजनसिंगी या मार्गावरील वाहतूक बंद झाली असल्याबाबत**

**(५) * १४०६९ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील धामणगांव रेल्वे येथील निम्नवर्धा प्रकल्पातील पाणी बिलदोरी नदीपात्रात आल्याने कौडण्यपूर ते अंजनसिंगी या मार्गावरील वाहतूक बंद झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव शेतक-यांना शेतात जाता येत नाही यामुळे येथे नवीन पूल बांधण्यात यावा या मागणीसाठी संबंधित ग्रामस्थ उपोषण व जलसमाधी आंदोलन करणार असल्याने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) ग्रामस्थांच्या निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने महामंडळस्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नायगाव (ता.पाटोदा, जि.बीड) येथील मयूर अभयारण्यातील चार हजार मोरांचे अस्तित्व धोक्यात असल्याबाबत**

**(६) * १६२१८ श्री.भिमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (ता.पाटोदा, जि.बीड) येथील मयूर अभयारण्यातील मोरांसाठी चारा आणि पाण्याची सोय नसल्याने सुमारे चार हजार मोरांचे अस्तित्व धोक्यात आल्याची गंभीर बाब माहे मार्च, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकाराची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले आहे आणि सदर अभयारण्यातील मोरांचे अस्तित्व टिकविण्यासाठी शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही. सदर अभयारण्य क्षेत्रात मोरांसाठी आवश्यक पाण्याची सोय व खाद्य उपलब्ध आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### माळढोक पक्षी अभयारण्यासाठी राखीव क्षेत्रातील जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार करणा-या व्यक्ती विरोधात कारवाई करण्याबाबत

**(७) * १५४५१ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळढोक पक्षी अभयारण्यासाठी सोलापूर जिल्हयात १२२२ चौ.कि.मी. क्षेत्र राखीव ठेवण्यात आले असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या राखीव क्षेत्रातील जमिनीचे खरेदी विक्री व्यवहार करण्यास मनाई असून देखील येथील जमिनींचे व्यवहार झाले असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच उक्त जमिन राखीव ठेवण्याअगोदर उक्त क्षेत्रामध्ये शेतघर, ठिंबक सिंचन इ. कामासाठी बँकेचे कर्ज काढण्यासाठी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ रोजी मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे यांनी नाहरकत प्रमाणपत्र देवूनही स्थानिक महसूल अधिका-यांच्या मनमानी कारभारामुळे शेतक-यांना बँकेचे कर्ज मिळण्यासाठी अडचणी निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सोलापूर व अहमदनगर जिल्हयातील एकूण १२२९.२४ चौ.कि.मी क्षेत्र माळढोक पक्षी अभयारण्य म्हणून दिनांक २७.०२.२०१२ च्या अधिसूचनेन्वये अधिसूचित करण्यात आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) माळढोक पक्षी अभयारण्याचे क्षेत्रामधील आरक्षित क्षेत्रामध्ये शेतघर, ठिबक सिंचन इ.कामासाठी बॅंकेचे कर्ज काढण्यासाठी मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे यांनी नाहरकत प्रमाणपत्र दिलेले नाही.

जमिनीवर बॅंक कर्ज/मॉरगेज यासाठी आवश्यक ते ना-हरकत प्रमाणपत्र /दाखला ''सध्याच्या वापरासाठी जमिनीचा जो वापर चालू आहे. त्या वापरामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही अशी अट'' घालून उपलब्ध करुन देण्याबाबत मुख्य वनसरंक्षक (वन्यजीव), पुणे यांचे कार्यालयाकडून त्यांचे पत्र दि. २१.०२.२०१४ अन्वये अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयास कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार व प्रचलित नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत उप विभागीय अधिकारी माढा विभाग, कुर्डुवाडी यांचेकडील पत्र दिनांक १२.०३.२०१५ अन्वये दुय्यम निबंधक, माढा/करमाळा यांना कळवले आहे. तसेच दि.३०.०३.२०१५ च्या पत्रान्वये जिल्ह्यातील बॅंकाना कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नॅशनल क्लिनिकल इस्टॅब्लिशमेंट कोन्सिलच्या “दर नियमन समितीने” शोधलेल्या वैद्यकीय क्षेत्रातील नफेखोरीला आळा घालणा-या पध्दतीला मंजूरी देण्याबाबत**

**(८) * १५१५८ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामान्य रुग्णांना परवडणारी वैद्यकीय सेवा मिळावी तसेच खाजगी डॉक्टरांचे नुकसान टाळून वैद्यकीय क्षेत्रातील नफेखोरीला आळा घालणारी पध्दत नॅशनल क्लिनिकल इस्टॅब्लिशमेंट कॅान्सिलच्या “दर नियमन समितीने” शोधली असून याकरिताचा प्रस्ताव शासनाकडे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य सेवा दर नियंत्रणात ठेवण्याची अत्यावश्यकता असल्याने उक्त प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) अशा प्रकारचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना पंचायत समिती अंतर्गत सन २००९ ते २०१४ या कालावधीमध्ये बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(९) * १६१३५ श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील कोरपना पंचायत समिती अंतर्गत सन २००९ ते २०१४ या कालावधीमध्ये बांधकामात गैरव्यवहार, अपूर्ण बांधकामाच्या तक्रारी असल्याचे माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याअंतर्गत अनेक घरकुल अपुर्ण अवस्थेत असल्यामुळे लाभार्थी वंचित झाले आहेत तसेच ग्रामसभेत रद्द झालेल्या लाभार्थ्यांना देयके देण्यात आली व शासनाचा निधी नियमबाह्य वितरीत करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले असून सदर चौकशी अहवालात काय निष्पन्न झाले व त्याचा तपशील काय आहे,

(४) त्याअनुषंगाने याप्रकरणातील संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्याप, याप्रकरणी चौकशी अथवा कारवाई करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) चौकशी सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोरपना यांना तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, चंद्रपूर यांनी कळविले आहे.

(४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कोरपना यांचेकडून चौकशी सुरु असून नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर शहरातील चंद्रपूर-मुल रोडवरील रेंजर कॉलनीत बिबटयाचा वावर**

**(१०) * १३५२५ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील चंद्रपूर-मुल रोडवरील रेंजर कॉलनीत बिबटयाचा वावर असल्यामुळे सदर परिसरातील नागरीक दहशतीच्या वातावरणात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी सदर बिबटयाने श्री. भंडारी यांच्या पाळीव प्राण्यावर हल्ला केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वन्य प्राणी शहरी भागात येणार नाहीत यासाठी कोणती ठोस उपाययोजना करण्यात आली आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दिनांक ११.०१.२०१५ श्री. संजय नारायण भंडारी यांच्या पाळीव कुत्र्यावर रात्री बिबटयाने हल्ला केला हे खरे आहे.

(४) वन्यप्राणी शहरी भागात येणार नाहीत. हयाकरिता चंद्रपूर वनविभागामार्फत खालील उपाययोजना करण्यात आलेली आहे.

- वन विभागाच्या अधिकारी / कर्मचा-यांमार्फत गस्त करण्यात येते.
- आर.आर.यु.युनिट पथकाद्वारे परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे.
- लोकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे.
- फटाके फोडून जंगलाकडे हुसकावण्याचे प्रयत्न करण्यात आले.

-----------------

**पुणे जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग ५५ इंदूरी जांभवडे, जाधववस्ती नवलाखे उंब्रे ते आंबळे ते इतर जिल्हामार्ग ६१ पर्यंतच्या रस्त्याचे कि.मी. ११/७०० ते १२/८०० चे बांधकामाच्या संदर्भात**

**(११) * १६२४३ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग ५५ इंदूरी जांभवडे, जाधववस्ती नवलाखे उंब्रे ते आंबळे ते इतर जिल्हामार्ग ६१ पर्यंतच्या रस्त्याचे कि.मी. ११/७०० ते १२/८०० चे बांधकामाच्या संदर्भात प्रधान सचिव, (उद्योग), प्रधान सचिव (पर्यावरण) (अतिरिक्त कार्यभार) यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०१४ रोजी सर्व संबंधित अधिका-यांची बैठक आयोजित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले आहेत, असल्यास, त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्यांच्या कामांमध्ये वन जमिनीचा अडसर येत असल्याने तो दूर करण्याबाबतचा प्रस्ताव क्षेत्रीय पातळीवर वन अधिकारी, पुणे यांचेकडे सादर केला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावावर क्षेत्रीय वन अधिकारी, पुणे विभाग यांनी कोणती कार्यवाही केली आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि. १६/९/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

- पुणे जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५५ या रस्त्यापैकी कि.मी. ११/८०० ते १४/१०० या एकूण १३०० मी. लांबीच्या रस्त्याचे काम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी हाती घ्यावे.
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी करावयाच्या १३०० मी. लांबीच्या रस्त्यापैकी ५०० मी. लांबीचा रस्ता वन विभागाच्या अखत्यारीत असल्यामुळे त्यास वन विभागाची परवानगी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्राप्त करुन द्यावी.
- सदर रस्त्याच्या कामासाठी लागणा-या रु. ३९५.९९ लक्ष (नक्त) व रु. ४५५.४० लक्ष (ठोक) इतक्या रक्कमेच्या प्रस्तावास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी तत्वतः मंजूरी प्रदान केली आहे.

(३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत ०.८७५ हे.आर. वन क्षेत्र मागणीचा प्रस्ताव उपवनसंरक्षक पुणे यांच्या कार्यालयाकडे सादर केला आहे.

(४) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सादर केलेल्या प्रस्तावाची उप वनसंरक्षक, पुणे यांनी तपासणी करुन प्रस्तावातील त्रुटीची पुर्तता करण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दि. १/८/२०१४ व दि. ९/१/२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील घनसांवगी तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागाने हाती घेतलेल्या शतकोटी वृक्ष लागवड योजनेबाबत

**(१२) * ७८३८ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील घनसांवगी तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागाने हाती घेतलेल्या शतकोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत ३९ कामांच्या माध्यमातून रस्त्यावरील दुतर्फा ८० किलोमीटरवर एक लाख रोपे लावण्याच्या कामासाठी तांत्रिक मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर मान्यतेनुसार या सर्व ३९ कामांवर केवळ ५६ हजार खड्डे खोदण्यात आल्याचे निदर्शनास आले असून त्यापोटी मजुरांना ३३ लाख रुपयांचीही मजूरी मिळणे अपेक्षित असतांनाही मजुरांना अद्यापही एक रुपयांची ही मजूरी मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(३) उक्त योजनेंतर्गत एक लाख रोपांची लागवड करण्याचे उद्दिष्ट असताना केवळ ५५ हजार रोपे लावण्यात आली असून पाण्याअभावी बहुतांश रोपे जळण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अपयशी ठरलेल्या योजनेची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात सामाजिक वनीकरण विभाग मार्फत शतकोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडीच्या ३९ कामांना तांत्रिक मान्याता देण्यात आल्या होत्या. तथापि सदरील काम ७८ किलोमिटर रस्त्यावर ७८ हजार रोपे लावण्याचे होते.

(२) सर्व मान्यता प्राप्त ३८ कामावर ५७७५३ खड्डे खोदल्याचे निदर्शनास आलेले आहे व त्यापोटी उपलबध दस्तऐवजानुसार मजुरांना रु.२२,६२,९७६/- इतकी मजुरीची रक्कम नियमानुसार अदा करण्यात आलेली आहे.

(३) अंशतः खरे आहे.

(४) उपविभागीय अधिकारी, अंबड यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. सामाजिक वनीकरण विभागाने प्राथमिक चौकशी करुन दोषी असणा-या अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कारवाई सुरु केलेली आहे.

(५) सदर प्रकरणी दोषी आढळून आलेले संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. तसेच विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यास कळविलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कामगार विमा रुग्णालयांच्या दुरवस्थेबाबत**

**(१३) * ५९४८ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कामगार विमा रुग्णालयांचा भार शासनाला पेलवेनासा झाल्याने सदर रुग्णालये राज्य शासनानेच चालवावीत अशी केंद्र शासनाने सुचना केल्यामुळे या रुग्णालयांची दयनीय अवस्था झाल्याचे माहे डिसेंबर २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील कामगार राज्य विमा योजना रुग्णालयाची दुरावस्था झाल्यामुळे कामगार वर्ग वैद्यकीय सुविधेपासून वंचित राहत असल्याने नाशिकसह मुंबई, नागपूर, औरंगाबाद, पुणे इत्यादी मोठया औद्योगिक क्षेत्रातील इएसआयसी रुग्णालयांचे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रुपांतर करण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) नुसार शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. दीपक सावंत :** (१) राज्य मंत्री मंडळाने ऑगस्ट २०१० मध्ये संपूर्ण राकावि योजना राकावि महामंडळ, नवी दिल्ली श्रम मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा निर्णय घेतला असून सद्यस्थितीत हस्तांतरणाची पुढील कार्यवाही राकावि महामंडळाकडे प्रलंबित आहे.

केंद्रीय राज्य मंत्री (श्रम व रोजगार) यांनी डिसेंबर, २०१४ मध्ये दिलेल्या मुंबई भेटीच्या वेळेस पत्रकार परिषदेत राकावि योजना राज्य शासनाने चालवावी असे जाहीर केले आहे. तथापी, यासंदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप लेखी सूचना प्राप्त झालेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्न भाग (१) बाबत

राकावि योजनेमार्फत पुरविण्यात येणा-या वैद्यकीय सेवा यापुढे अधिक प्रभाविपणे पुरविता याव्या या करिता राकावि महामंडळ, नवी दिल्ली, श्रम मंत्रालय, भारत सरकार यांनी जुलै, २०१४ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार "राज्य कार्यकारी समिती" स्थापित करण्यात आली असून सदर समिती दि. ०८.०१.२०१५ पासून कार्यन्वित करण्यात आली आहे.

प्रश्न भाग (२) बाबत

राकावियी रुग्णालयांचे सुपर स्पेशलिटी रुग्णालयांमध्ये रुपांतर करणे ही बाब श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांच्या अधिपत्याखालील राकावि महामंडळ, नवी दिल्ली यांच्या अखत्यारित आहे.

(४) कार्यवाही करण्यात आली असल्याने विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मावळ (जि.पुणे) तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या भजन मोर्चाबाबत**

**(१४) * १५४३८ श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचा-यांनी विविध मागण्यासाठी मावळ तालुका ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या वतीने दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी तहसिल कार्यालयावर ''भजन मोर्चा'' काढून धरणे आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत कर्मचा-यांना दिनांक १ जुलै, २००७ पासूनचा राहणीमान भत्ता व त्याची थकबाकी रक्कम व दिनांक ७ ऑगस्ट, २०१३ पासून शासन निर्णयाप्रमाणे वेतनवाढ करुन थकबाकी देण्यात येणार आहे काय,

(३)तसेच, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांच्या आदेशानुसार मंजूर झालेली माहे एप्रिल ते ऑगस्ट, २०१४ ची अनुदान रक्कम देणार आहे काय,

(४) तसेच, ग्रामपंचायत कर्मचा-यांना विविध समस्या व मागणी बाबत शासन स्तरावर निर्णय झाला आहे काय व असल्यास, निर्णयाची अंमलबजावनी केव्हापासून होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय.

(३) मु.का, जि.प. आदेश क्र. जिप/पंचा/१५/६४१/१४, दिनांक ०७.११.२०१४ नुसार सदर रक्कम मावळ गटातील ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आली असून पंचायत समिती, मावळ यांनी त्यांचे आदेश क्रमांक ९८/१५, दिनांक १३.०१.२०१५ नुसार सदर रक्कम ग्रामपंचायतीकडे कर्मचा-यांना अदा करण्यासाठी सुपुर्द केली आहे.

(४) ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या विविध मागण्या असून सदर मागण्यांमधील शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ नुसार ८.३३ % रक्कम भविष्य निवार्ह निधी खात्यात जमा करणे व १४ जुलै, २००९ नुसार सेवापुस्तक अद्ययावत करणे व शासन निर्णय दिनांक ०८ जुलै, २०१३ नुसार ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या वेतनाकरीता ग्रामपंचायतीचा २५% वरुन ३५% निधी खर्च करण्याबाबत तरतूद करण्यात आली व शासन निर्णय दिनांक ०४ मार्च, २०१४ नुसार लोकसंख्या व उत्पन्नानुसार १००%, ७५% व ५०% शासन अनुदान देण्याबाबत निर्णय झाला आहे. त्याबाबतची अंमलबजावणी सुरु झाली आहे. तसेच इतर मागण्यांबाबत आढावा घेण्यात येत आहे.

तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित होणा-या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हा परिषद, पुणे मार्फत अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाशिम जिल्ह्यातील मनोरा, वाशिम, मालेगाव व रिसोड या तालुक्यांच्या मानव विकास निर्देशांक वाढविण्याबाबत**

**(१५) * १५६५८ श्री.लखन मलिक (वाशिम) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानव विकास कार्यक्रमांतर्गत राज्यातील अति मागास भागात असलेल्या १२ जिल्ह्यातील तालुक्यांचा निर्देशांक ०.४३ पेक्षा कमी आहे, अशा तालुक्याच्या आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सन २००६ मध्ये मानव विकास मिशन स्थापन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनांमुळे वाशिम जिल्ह्यातील समाविष्ट मनोरा, वाशिम, मालेगाव व रिसोड या तालुक्यांचा मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी प्रयत्न केला जाणार होता व सन २०११ मध्ये या कार्यक्रमाचा दुसरा टप्पा प्रारंभ झाला, परंतु नियोजित वेळापत्रकानुसार या कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मानव विकास मिशनची अंमलबजावणी कागदावरच राहिल्याने योजनेचे उद्दीष्ट पूर्ण होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजना केवळ कागदावरच राहण्याची कारणे काय,

(५) असल्यास, ही योजना तातडीने कार्यान्वित करुन मानव विकास निर्देशांक वाढविण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) राज्यातील १२ अतिमागास जिल्हयांचा मानव विकास निर्देशांक उंचावण्यासाठी सन २००६ मध्ये मानव विकास मिशनची स्थापना करण्यात आली आहे.

(२) सन २०११ पासून या कार्यक्रमाची व्याप्ती वाढवून २२ जिल्हयांमधील १२५ तालुक्यात हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यामध्ये वाशिम जिल्हयातील मानोरा, वाशिम, मालेगाव व रिसोड या तालुक्यांचा समावेश असून या तालुक्यात सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वणी, मारेगांव व झरी-जामणी (जि.यवतमाळ) या सर्व तालुक्यात पट्टेदार वाघाची असलेली दहशत

**(१६) * १५३०४ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी, मारेगांव व झरी-जामणी संपूर्ण (जि. यवतमाळ) तालुक्यात पट्टेदार वाघाची दहशत पसरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षभरात या परिसरात वाघाच्या हल्ल्यात जखमी व मृत्यु झालेल्या व्यक्तींना शासनाकडून कोणती मदत मिळाली आहे,

(३) तसेच गत एक -दिड वर्षापासून या भागातील शेतक-यांची जनावरे मारण्याचा प्रकार घडत आहे, त्यामुळे शेतक-यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दिनांक १६ जानेवारी २०१५ च्या शासन निर्णयात जनावरांच्या नुकसान भरपाईचा उल्लेख करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय, .

(५) असल्यास, शासन निर्णयात आवश्यक ती सुधारणा करुन जनावरांचा मोबदला मिळण्यासाठी शेतक-यांना न्याय मिळवून देणार आहे काय,

(६) असल्यास, वाघाचा बंदोबस्त करण्यात वन विभागाला अपयश येत आहे, हे खरे आहे काय, असल्यास परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शासन यावर काय उपाययोजना करणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) यवतमाळ जिल्ह्यातील वणी आणि झरी जामणी तालुक्यात चार वाघांचा वावर आहे. हया परिसरात गेल्या सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ (फेब्रुवारी, २०१५ पर्यंत) वाघाच्या हल्ल्यात ३१६ पाळीव जनावरे व ३ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

वरील सर्व प्रकरणात नुकसानग्रस्त व्यक्तीस / कायदेशीर वारसास शासन निर्णयातील तरतूदीनुसार आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(४) हे खरे आहे. दिनांक १६ जानेवारी, २०१५ चा शासन निर्णय फक्त मनुष्यहानीबाबत द्यावयाच्या नुकसान भरपाईत वाढीबाबतचा आहे, तथापि दि.०२.०७.२०१० च्या शासन निर्णयान्वये पशुधनाचा मृत्यु/अपंगत्व/जखमी झाल्यास अर्थसहाय्याची तरतूद करण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे नुकसान भरपाईपोटी अर्थसहाय्य दिले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) वनविभागाला वाघाचा बंदोबस्त करण्यात अपयश आले हे खरे नाही.

- गावक-यांनी घ्यावयाच्या खबरदारीबद्दल जागृती सातत्याने करण्यात येत आहे.
- वन विभागातील अधिकारी / कर्मचारी नियमित गस्त घालतात.
- वाघांपासून सतर्कतेबाबत अवगत करण्यात येते.
- वाघाने ठार केलेल्या जनावरांच्या प्रकरणात लवकरात लवकर आर्थिक मदत देण्यात येत आहे.
- वाघाचे हालचालीवर दीर्घ काळ सनियंत्रण करण्यासाठी सत्वर अभ्यास हाती घेणेबाबत भारतीय वन्यजीव संस्था, देहरादून यांना विनंती करण्यात आलेली आहे.

-----------------

**नागपूर उमरेड येथे वनविकास महामंडळाच्या लाकुड लिलावावर व्यापा-यांनी बहीष्कार टाकल्याबाबत**

**(१७) * १५६७४ श्री.सुधीर पारवे (उमरेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर उमरेड येथे वनविकास महामंडळाच्या लाकुड लिलावावर व्यापा-यांनी बहीष्कार टाकल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉट नं. २६५१ ची बोली रु. १ लक्ष १५ हजारात झालेली असता हा लिलाव रद्द करुन लिलाव अधिका-यांनी मर्जीतील व्यापा-याला रु. १ लक्ष ६ हजारात म्हणजे शासनाचे नुकसान करुन कमी दरात सदर लॉट देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अंती कार्यवाहीचा तपशिल काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे अंशतः खरे आहे.

दि. ४/२/२०१५ रोजी नागपूर वन प्रकल्प विभागातील खेडी विक्री आगारावर वन उपज मालाचे लिलावात खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतल्यामुळे पुरेशी स्पर्धा निर्माण होऊन वनउपजास चांगली किंमत प्राप्त झाली असून, सरासरी रु. ४७०००/- प्र.घ.मी. पेक्षा जास्त दर प्राप्त झाले.

लॉट क्रमांक २६५१ ची बोली सुरु झाल्यावर खरेदीदारांनी रु. १.१५ लक्ष पर्यंत बोली दिली. परंतु नंतर संबंधीत खरेदीदाराने कोणतेही कारण नसतांना बोली नाकारुन इतर खरेदीदारांच्या मदतीने लिलाव प्रक्रियेमध्ये नियमबाह्य अटी टाकून गोंधळ घालण्याचा प्रयत्न केल्यामुळे सदरहू लॉटची आलेली बोली रद्द करुन सदरहू लॉट तहकुब करण्यात आला. परंतु काही खरेदीदारांनी तहकुब केलेल्या त्या लॉटची पुन्हा बोली करण्याची विनंती केल्यावरुन, महत्तम किंमत रु. १.१० लक्ष आल्याने सदरहू लॉट विक्री करण्यात आला. ही किंमत निर्धारित दर ( Upset Price) रु. ४२२६/ प्र.घ. पेक्षा जास्त असल्याने, वन विकास महामंडळाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही.

(२) हे खरे नाही.

सदरहू लॉटची बोली रु. १ लक्ष १५ हजार पर्यंत झाली असतांना संबंधित खरेदीदाराने बोली नाकारल्यामुळे, या लॉटचा पुन्हा जाहिर लिलाव करुन खरेदीदारांची बोली स्विकारुन अंतिम महत्तम बोली रु. १ लक्ष १० हजार ला सदरहू लॉटची विक्री करण्यात आली. सदरची किंमत निर्धारित किंमत ( Upset Price) पेक्षा जास्त असल्याने यामध्ये महाराष्ट्र वनविकास महामंडळाचे नुकसान झालेले नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सर्प हा वन्य जीव समजुन ग्रामीण भागात सर्पदंश झालेल्या मृतांच्या वारसांना अर्थ सहाय्य आणि नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१८) * १२१६७ श्री.बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००७ पासुन राज्यात एकूण ३७,२३० व्यक्तींना सर्पदंश होवुन उपचाराभावी २०६ पेक्षा अधिक जणांचा मृत्यु झाला असून ग्रामीण भागातील ७० टक्के सर्पदंश आणि मृत्यु पाहता त्यात मृतांच्या वारसांना सर्प हा वन्य जीव समजुन अर्थ सहाय्य आणि नुकसान भरपाई देण्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक २२ जून, २०१० पासून ते आजतागायत शासनास पत्र लिहुन पाठपुरावा करुन अर्थ सहाय्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, शासन सर्पाला वन्य जीव समजुन बाधीत कुटुंबांना कशी आणि केव्हा मदत करणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सर्पदंश प्रकरणात नुकसान भरपाई देणेबाबत लोक प्रतिनिधीकडून निवेदने प्राप्त झाली आहेत ही बाब खरी आहे.

(२) व (३) सर्पदंशाच्या प्रकरणात आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासन विचाराधीन आहे त्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुलाबा परिसरातील समुद्रकिनारी असलेल्या तिवरांची कत्तल करुन झोपड्या बांधल्या जात असल्याबाबत**

**(१९) * १५११० श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा परिसरातील समुद्रकिनारी असलेल्या तिवरांची मोठ्या प्रमाणात कत्तल करुन अनेक नवीन झोपड्या बांधल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या झोपडपट्टीत जास्तीत जास्त बांगलादेशीय वास्तव्यास आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक नागरिकांनी या बाबतच्या तक्रारी वारंवार केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अनधिकृत झोपडपट्टी हटविणेबाबत तसेच संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) कुलाबा परिसरातील समुद्रकिनारी आंबेडकर नगर व गणेशमुर्ती नगर या झोपडपट्टीला लागून असलेल्या वन विभागाच्या ताब्यातील राखीव वन न.भू.क्र. ६५३ मधील क्षेत्रात माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१४ मध्ये नव्याने १४ कच्च्या झोपड्या तयार केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून त्याबाबत पुढील चौकशी चालू आहे.
(२) सदर झोपडपट्टीत राहणारे लोक बांगलादेशीय असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) स्थानिक नागरिकांच्या याबाबतच्या तक्रारी वन विभागाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.
(४) व (५) अनधिकृत अतिक्रमणाबाबत चौकशी सुरु आहे. चौकशी पुर्ण झाल्यानंतर पोलीस विभागाची मदत घेवून वन विभाग व महसूल विभाग यांच्या संयुक्त कारवाईद्वारे अवैध अतिक्रमणे हटविण्यात येतील.

-----------------

## नांदगांव पेठ (जि. अमरावती) येथील सिमेंट नाला खोलीकरण व बांधकामात निधीचा अपहार केल्याबाबत

**(२०) * १३९८० श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव पेठ (जि. अमरावती) येथील सिमेंट नाला खोलीकरण व बांधकाम सुरु असून जामठी नाल्याचे खोदकाम केल्यानंतर त्या नाल्यात पुन्हा माती भरण्याचे काम येथील कृषी विभागाने करुन शासनाच्या निधीचा अपहार केल्याचे दिनांक २६ जून, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती निधीचा अपहार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) नाही,

तथापि, यासंदर्भात वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती, त्यानुसार उपविभागीय अधिकारी (महसुल) यांनी फेब्रुवारी, २०१५ मध्ये पाहणी केली असता नाला सुस्थितीत असुन नाल्यामध्ये पाणी असल्याचे व नाल्यात माती भरलेली नसल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पल्स पोलिओ लसीकरणाच्या मोहिमेबाबत**

**(२१) * १२२४८ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेची जबाबदारी मुंबईत महापालिकेतील आरोग्य स्वयंसेविका, पालिका कर्मचारी आणि शिक्षकांमार्फत राबविण्यात येत होती परंतु अल्प मानधन व रविवारच्या सुट्टीच्या बदली पर्यायी रजा न दिल्यामुळे संबंधितांनी सदरहू पल्स पोलिओचे काम नाकारल्यामुळे सदरहू काम मुंबईतील कॉलेज मधील विद्यार्थ्यांवर सोपविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची नेमक वस्तुस्थिती काय आहे,

(३) असल्यास, कामाचा मोबदला अल्पप्रमाणात मिळत असल्यामुळे सदरहू काम करण्यास कॉलेजमधील विद्यार्थ्यांनीही नकार दिल्यामुळे आता इ. ९ वी १० वी मधील शालेय विद्यार्थ्यांकडून पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पल्स पोलिओ लसीकरण मोहिम यशस्वीपणे राबविण्याकरीता सद्यःस्थितीत त्यात कोणते बदल करण्यात येणार आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

पल्स पोलिओ कार्यक्रमांत आरोग्य कर्मचा-याशिवाय इतर सेवाभावी संस्था नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी, एनसीसी चे विद्यार्थी, अंगणवाडी सेविका इत्यादी कर्मचा-यांचा सहभाग घेऊन कार्यक्रम राबविण्यात आला. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे प्रत्येक कर्मचा-यांना रु. ७५ इतके मानधन अदा करण्यात आले.

(३) हे खरे नाही.

(४) पल्स पोलिओ लसीकरण मोहिम हा कार्यक्रम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे राबविण्यात येत असल्याने यात बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण नाथसागर जलाशयातून आपेगांव- हिरडपुरी बंधा-यात कायमस्वरुपी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२२) * १५६०२ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण नाथसागर जलाशयातून आपेगांव- हिरडपुरी बंधाऱ्यात कायमस्वरुपी पाणी उपलब्ध व्हावे अशी मागणी स्थानिक गावक-यांनी संबंधित विभागाकडे नुकतीच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधा-यात कायमस्वरुपी पाणी उपलब्ध करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

तथापि यावर्षी आपेगाव व हिरडपुरी बंधा-यात पावसाळ्यात पाणी उपलब्ध न झाल्यामुळे तसेच टंचाईसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे नोव्हेंबर, २०१४ व जानेवारी २०१५ मध्ये आपेगाव हिरडपुरी बंधा-यात जायकवाडी धरणातून पाणी सोडण्याबाबत स्थानिक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेली होती.

(२) उक्त बंधा-यात कायमस्वरुपी जायकवाडी धरणातून पाणी सोडण्याची तरतूद मंजूर प्रकल्प अहवालात नाही.

तथापि पाणी टंचाई लक्षात घेता जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार उपरोक्त बंधा-यामध्ये नोव्हेंबर २०१४ व फेब्रुवारी २०१५ मध्ये पाणी सोडण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायपाटण टक्केवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायत हद्दीतील स्थावर मालमत्तेवर ग्रामपंचायतीच्या संगनमतामुळे झालेले अतिक्रमण हटविण्याबाबत**

**(२३) * १५५८८ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपाटण टक्केवाडी (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे क्र. ३६ -अ-२, हिस्सा क्र.२० या स्थावर मालमत्तेवर ग्रामपंचायतीच्या संगनमतामुळे झालेले अतिक्रमण हटविण्यात यावे म्हणून श्री.श्रीकांत रामकृष्ण कोलते व अन्य ग्रामस्थांनी तहसिलदार, राजापूर, गटविकास अधिकारी राजापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी, सचिव, ग्रामविकास, जलसंधारण विभाग यांचेकडे नोव्हेंबर, २०१४ व तद्नंतर आजमितीस सातत्याने लेखी निवेदनाद्वारे तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीनुषंगाने सदरहू अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम हटविण्याऐवजी अतिक्रमण करणाऱ्यांशी असलेल्या संगनमतामुळे अतिक्रमण पाठिशी घालण्याचा जाणीवपूर्वक प्रकार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) अशी बाब नाही.

(३) व (४) रायपाटण ग्रामपंचायत क्षेत्रातील भूमापन क्र. ३६-अ-१, हिस्सा क्र.२० मधील सह हिस्सेदार श्री. राजाराम तुकाराम कोलते यांनी ग्रामपंचायतीकडे सादर केलेला स.नं. ३६-अ, हिस्सा नं.२० चा ७/१२ उतारा, स्थळ दर्शक नकाशा, सहायक अधिक्षक, जिल्हा न्यायालय रत्नागिरी यांचेकडील जागेसंबंधिचे कच्चे वाटप पत्र व हमीपत्र इ. कागदपत्रांच्या आधारे ग्रामपंचायत रायपाटण यांनी मासिक सभा दि. २६.०९.२०१३, ठराव क्र. ६ (६) अन्वये ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५२ नुसार अटी व नियम यांना अधीन राहुन श्री.राजाराम तुकाराम कोलते यांना रायपाटण ग्रामपंचायत क्षेत्रातील भूमापन क्र.३६-अ-१, हिस्सा क्र.२० मध्ये घर बांधकामास परवानगी दिली आहे.

वरील मिळकतीच्या वाटपाबाबत मे.दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) राजापूर यांचेकडे दाखल करण्यात आलेल्या रेग्युलर दिवाणी दरखास्त नं. २३/२०१२ मध्ये दि. २२ ऑक्टोबर, २०१२ च्या आदेशान्वये सदर मिळकतीच्या वाटपाकरीता जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना आयुक्त म्हणून नेमण्यात आले आहे. सदर प्रकरणी अंतिम वाटपासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यात आमदार आदर्श ग्राम योजना राबविण्याबाबत**

**(२४) * १०४१४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्राच्या आदर्श गाव योजनेच्या धर्तीवर राज्यातही आमदार आदर्श ग्राम योजना राबविण्याचे राज्यशासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यशासनाच्या विचाराधीन असलेल्या आमदार आदर्श ग्राम योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या प्रस्तावित योजनेच्या खर्चाबाबत ग्रामविकास आणि अर्थ विभागाने कोणती तरतूद केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.
(२) आमदार आदर्श ग्राम योजना राज्यात राबविण्याबाबतचा निर्णय दिनांक १९ मार्च, २०१५ च्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.
(३) या योजनेत केंद्र व राज्य शासनाच्या अस्तित्वात असलेल्या विविध योजनांच्या कृतिसंगमाद्वारे अंमलबजावणी करण्यात येणार असून निवडलेल्या ग्रामपंचायतीमध्ये आमदार निधीतून घेण्यात येणा-या अनुज्ञेय असलेल्या कामासाठी राज्य शासनाकडून जोड निधी देण्यात येईल. वन क्षेत्रांतर्गत निवडलेल्या गावातील वन व्यवस्थापन समिती, वनग्राम समिती यांचेमार्फत वनीकरण, वन तलाव, जंगलाचे आगीपासून संरक्षण, ग्राम संरक्षण इत्यादी कामे आमदार निधीतून अनुज्ञेय करण्यात येतील.

सदर योजनेसाठी स्वतंत्र निधीची मागणी व तरतूद प्रस्तावित नसून उपलब्ध मंजूर नियतव्ययातूनच ०.५ % निधी उपलब्ध करुन त्यामधून योजना कार्यान्वित करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई गोवा महामार्गावरील कळंबणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयातील शवागार यंत्रणा बंद असल्याबाबत**

**(२५) * ६२२५ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोवा महामार्गावरील कळंबणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयातील शवागार यंत्रणा बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने पाच वर्षापूर्वी ८ लाख रुपये खर्चून रुग्णालयाला शवपेटी दिली परंतु ती ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या शवागाराच्या उभारणीसाठी २ लक्ष रुपये उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महामार्गावर व परिसरात सतत होत असलेले अपघात, त्यात नाहक जाणा-या बळींची संख्या पाहता या असुविधा दूर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही. या रुग्णालयास पोस्ट मार्टेम रुम व शवपेटी मंजूर आहे. दिनांक १७.०८.२०१२ रोजी रुग्णालयास शवपेटी प्राप्त झाली. परंतु जागे अभावी पोस्ट मार्टेम रुम बांधण्यात आली नव्हती. शवागार रुमचे बांधकामाकरिता ऑक्टोबर- २०१४ मध्ये रु. ७.८० लक्ष अनुदान देण्यात आले असून बांधकाम डिसेंबर - २०१४ अखेर पूर्ण करण्यात येऊन दिनांक २६.०१.२०१५ पासून शवागार यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

(३) मुंबई - गोवा महामार्गावर कळंबणी (ता.खेड, जि.रत्नागिरी) उपजिल्हा रुग्णालय कार्यरत असून येथे ट्राम केअर युनिट (२० खाटा), अतिदक्षता विभाग (२० खाटा), अर्भक विभाग १० खाटा उपलब्ध आहेत.

-----------------

**दाजीपूर वन्यजीव अभयारण्यातील (जि.कोल्हापूर) गवे सीमोल्लंघन करुन लगतच्या शेतात घुसून नुकसान करीत असल्याबाबत**

**(२६) * ११२०३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाजीपूर वन्यजीव अभयारण्यातील (जि.कोल्हापूर) गवे सीमोल्लंघन करुन लगतच्या शेतक-यांच्या शेतात घुसून शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वनविभाग दरवर्षी या गव्यांच्या बंदोबस्तासाठी चरी खोदण्याचे काम फक्त कागदोपत्रीच करीत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या गव्यांच्या बंदोबस्तासाठी आता कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) राधानगरी तालुक्यात असणा-या राधानगरी अभयारण्यात तसेच अभयारण्याच्या (पूर्वीच्या दाजीपूर अभयारण्यासह) बाहेरील क्षेत्रातसुध्दा गव्यांचे अस्तित्व आहे.

सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ (फेब्रुवारी, २०१५) पर्यंत अभयारण्य तथा अभयारण्याबाहेर क्षेत्रात एकूण २०५५ प्रकरणात रानगव्यांने शेतपिक नुकसान केल्याचे निदर्शनास आले असून नुकसानग्रस्त शेतक-यास शासन निर्णयातील तरतूदीनुसार आर्थिक मदत देण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) राधानगरी अभयारण्य क्षेत्रातील गवे जंगलक्षेत्राचे बाहेर येऊ नये म्हणून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- वनक्षेत्रात कुरण विकास, वनतळ्यांची कामे घेण्यात येत आहेत.
- सद्‌यस्थितीत पारंपरिक उपाययोजना करुन वन्यप्राण्यांना मनुष्यवस्तीपासून दूर ठेवण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी तसेच वनकर्मचारी यांचेमार्फत शेतपिकांचे नुकसान टाळण्याचे प्रयत्न केले जात आहेत.
- वन्यप्राण्यांना मानवी वस्तीत व शेतक-यांच्या शेतात येण्यासाठी अटकाव करण्याच्या दृष्टीने वनक्षेत्राच्या हद्दीवर आवश्यकतेनुसार वन्यप्राणी प्रतिबंध चर घेण्यात आलेले आहेत.
- वनाधिकारी व वनकर्मचारी रानगवांच्या हालचालींवर लक्ष ठेऊन त्यांना मानवी वस्तीपासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहेत.
- कर्मचा-यांना आवश्यकतेनुसार वाहनांची सोय, बिनतारी संदेश यंत्रणा, हातवाही संच इत्यादी सुविधा अंमलबजावणीसाठी पुरविण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**विदर्भ पाणलोट विकासांतर्गत पुसद वन विभाग (जि.यवतमाळ) अंतर्गत सुमारे १३ कोटी रूपयांची कामे कागदोपत्री झाल्याचे दर्शवून झालेला कोटयवधी रूपयांचा आर्थिक गैरव्यवहार**

**(२७) * १३७४० श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ पाणलोट विकासांतर्गत पुसद वन विभागामध्ये सन २०१०-११ मध्ये सुमारे १३ कोटी रूपयांची कामे करतांना कागदोपत्री कामे केल्याचे दर्शवून कामांमध्ये आर्थिक घोटाळा करण्यात आल्यानंतर चेकद्वारे पेमेंटची रक्कम प्रदान न करता प्रत्यक्षात रोखीद्वारे देतांना योजनेच्या कामामध्ये वनाधिका-यांच्या संगनमताने कोटयवधी रूपयांची आर्थिक अफरातफर करण्यात आल्याच्या तक्रारीवरून तब्बल चार वेळा चौकशी झाल्यानंतर दोषींवर कोणतीही कार्यवाही न झाल्याने प्रधान सचिव (वने) यांचेकडून माहे ऑगस्ट २०१४ मध्ये वा त्या दरम्यान प्रधान मुख्य वनसंरक्षक या प्रकरणाची नव्याने सखोल चौकशी करण्याचे चौकशी अहवाल सादर करण्यासाठी आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच उक्त प्रकरणी वारंवार चौकशी करण्याची नेमकी कोणती कारणे आहेत व आतापावेतो शासनाकडे अनेकदा चौकशी अहवाल सादर झाल्यानंतर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२), (३) व (४)

विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत पुसद वन विभागामध्ये सन २०१०-११ मध्ये करण्यात आलेल्या कामाची रक्कम रु. १०.४० कोटी ग्राम पाणलोट विकास समितीस धनादेशाद्वारे वितरीत करण्यात आली.

सदर प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सर्वप्रथम विभागीय वन अधिकारी (दक्षता), यवतमाळ यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली. तथापि सदर प्रकरणाची तपासणी मुख्य वनसंरक्षक दर्जाच्या वरीष्ठ अधिका-यांमार्फत व त्रयस्थ

यंत्रणेमार्फत होणे आवश्यक वाटल्याने शासनाने दिनांक २२.०१.२०१४ रोजीच्या पत्रान्वये महा व्यवस्थापक, वन विकास महामंडळ मर्या., नागपूर यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले. महा व्यवस्थापक यांनी शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) यांचे अभिप्राय मागविण्यात आले तसेच अनियमिततेस जबाबदार संबधितांविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्याचा प्रस्ताव सादर करण्यास कळविले.

प्रधान मुख्य वन संरक्षक यांनी दिनांक ०६.०८.२०१४ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय सादर केले, त्यानुसार विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत पुसद वन विभागामध्ये एकुण ४५ गावांमध्ये पाणलोटाची विविध कामे करण्यात आली असून महा व्यवस्थापक, यांच्या चौकशी अहवालामध्ये, त्यांनी या गावांपैकी किती गावातील कामांची प्रत्यक्षात भौतिक तपासणी केली यांचा निश्चित बोध नाही. त्यामुळे संबधितांवर जबाबदारी निश्चित करणे अवघड असल्याने सदर अहवाल स्वयंपूर्ण नसल्याचे कळविले.

त्यामुळे शासनाने दिनांक १९.०८.२०१४ च्या पत्रान्वये प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) यांना याबाबत सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) यांनी दिनांक ११.०२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार विविध पाच पथकामार्फत करण्यात आलेल्या चौकशीनूसार विदर्भ पाणलोट विकास मिशन अंतर्गत करण्यात आलेली कामे जागेवर आढळून आलेली आहेत. तसेच त्यातील बहुतांश कामे समाधान कारकरित्या करण्यात आलेली आहेत. तथापि प्रकल्प राबवितांना काही उणिवा निदर्शनास आल्या असून त्यास जबाबदार संबधितांविरुध्द कार्यवाहीचे निर्देश प्रधान मुख्य वन संरक्षक यांनी दिले आहेत. सदर अहवालाची शासन स्तरावर छाननी करण्यात येत आहे.

-----------------

## सिंधूदुर्ग जिल्हयातील तिलारी प्रकल्पात ३० वर्षापासून कंत्राटी कामगारांना सेवेत कायम न केल्याबाबत

**(२८) * ९०२७ श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधूदुर्ग जिल्हयातील तिलारी प्रकल्पात ३० वर्षापासून कंत्राटी कामगारांना सेवेत कायम न केल्याने जानेवारी २०१५ पासून संस्था स्थापन करून प्रकल्प कामावर सामावून घेण्याचा निर्णय शासनाने घेऊनही कामावर घेण्यात आले नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार सदर कंत्राटी कामगारांना सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ग्रामपंचायत नांदा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथील सरपंच आणि ग्राम विस्तार अधिकारी यांनी अंगणवाडी बांधकामात १० लाख रुपयांचा केलेला गैरव्यवहार**

**(२९) * १४२४७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत नांदा (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथील सरपंच आणि ग्राम विस्तार अधिकारी यांनी अंगणवाडी बांधकामात १० लाख रुपयांचा भ्रष्ट्राचार केला असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१४ रोजी नेमलेल्या चौकशीत सिध्द झाले असतांनाही अद्यापही त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे काय व दोषींवर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे.
(२) याबाबत चौकशी करण्यात आली असून सदर प्रकरणात सकृतदर्शनी दोषपात्र सचिव श्री.आर.एन.बोप्पनवार यांना कार्यालयीन आदेश दिनांक २१.०१.२०१३ नुसार निलंबित करण्यात आले असून त्यांचेवर विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायत सरपंच सौ.पुजा ज्ञानेश्वर मडावी, यांचेवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९(१) अन्वये कार्यवाही करण्यास्तव परिपुर्ण प्रस्ताव

विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांचेकडे सादर करण्यात आले आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**सन २०१३-१४ मध्ये विदर्भात सिंचनासाठी प्राप्त १८०० कोटी रुपये अद्‍यापही खर्च झाले नसल्याबाबत**

**(३०) * १४०७० ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३-१४ मध्ये विदर्भात सिंचनासाठी आलेले १८०० कोटी रुपये अद्‍यापही खर्च झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी असूनही प्रकल्पाचे काम करायला आवश्यक असलेले मनुष्यबळ (सिंचन प्रकल्पांवर अभियंत्याची ४६२ रिक्त पदे असणे) जलसंपदा विभागाकडे नसल्याने हा अनुशेष वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशतः खरे आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे दि.१/४/२०१४ रोजी रु.२०७१ कोटी निधी शिल्लक होता.
(२) अभियंत्यांची रिक्त पदे भरणे हे निधी अखर्चित राहण्याचे एकमेव कारण नसुन भूसंपादन, पुनर्वसन, वन जमीन संपादन इ. कारणामुळे निधीचा विनियोग होवू शकलेला नाही.
(३) अभियंत्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

**सन २०१४-२०१५ या वर्षात जलसंधारण विभागाकडून कोकणासाठी मंजूर झालेल्या १३ लघुसिंचन प्रकल्पाबाबत**

**(३१) * ६२२६ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४-२०१५ या वर्षात जलसंधारण विभागाकडून कोकणासाठी मंजूर झालेले १३ लघुसिंचन प्रकल्प शासनाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये रद्द केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंचनाच्या बाबतीत राज्याच्या अन्य विभागांपेक्षा कोकणातील सिंचनाचा टक्का खूपच कमी आहे आणि इथल्या शेतक-याला केवळ निसर्गावरच अवलंबून राहावे लागते, असे केळकर समितीच्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असताना पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न सोडविणारे १३ लघुसिंचन प्रकल्प रद्द करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सिंचनक्षेत्र वाढविण्यासाठी शासनाने काही पर्यायी उपाययोजना केल्या आहेत काय, असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

ठाणे लघुसिंचन मंडळाकडील एकूण १९ प्रकल्प महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांनी ऑक्टोबर, २०१४ मध्ये रद्द केले आहेत. ऑक्टोबर, २०१३ च्या केळकर अहवालामध्ये कोकण विभागातील पूर्ण झालेल्या प्रकल्पांची सिंचन क्षमता कमी आहे.

(३) व (४)

सदर १९ प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त होण्याच्या अटीवर प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तथापि, तसे प्रमाणपत्र विहीत वेळेत प्राप्त न झाल्याने प्रकल्पांच्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आल्या. पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर अनुदानाच्या उपलब्धतेनुसार पुन्हा प्रशासकीय मान्यता देऊन कामे करुन घेण्याचे नियोजन करण्यात येईल.

----------------

**विधान भवन :**<br>**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**<br>**प्रधान सचिव,**<br>**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.